महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २९ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ०९७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आज कोकणातील सर्व जिल्ह्यांना रेड अलर्ट!

## मनुष्य व पशुहानी टाळण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे,दि.28 :** कोकण किनारपट्टीवरील मुंबई, ठाणे पालघर, रायगड या जिल्ह्यांना पुढील २४ तासांसाठी रेड अलर्ट दिल्याने जिल्ह्यातील आपत्कालीन यंत्रणेला सज्ज राहण्याचे निर्देश दिले. कालपासून झालेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यासह या जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीचा आढावा घेतला. यावेळी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी त्यांनी जिल्हा प्रशासनाला सज्ज राहण्याचे तसेच मनुष्य व पशुहानी टाळण्यास सर्वोच्च प्राधान्याने दक्ष राहण्याचे निर्देश दिले.

यावेळी कोकण विभागाचे विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, पालघर जिल्हाधिकारी इंदू राणी जाखड, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि मुंबई, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर, मीरा भाईंदर, वसई विरार, भिवंडी या महानगरपालिकांचे आयुक्त दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, पालघर, रायगड, कल्याण - डोंबिवली, उल्हासनगर,भिवंडी, मीरा भाईंदर, वसई - विरार या महानगरपालिकांच्या क्षेत्रात गेल्या २४ तासात पडलेल्या पावसाची माहिती घेतली. यात सर्वच ठिकाणी मुसळधार पाऊस पडला असला तरी सरासरी ८० ते १०० मिमी पाऊस पडल्याने सर्वांनी सांगितले. ठाणे, पालघर, रायगड येथील नद्यांची पातळी वाढली असली तरी धोकादायक पातळीपेक्षा खाली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. बदलापूर मध्ये काल एक व्यक्ती वाहून गेल्याची घटना वगळता कुठेही जीवितहानी अथवा पशुधन हानी झाल्याची घटना घडली नसल्याचे सांगण्यात आले. पावसाचा जोर कमी जास्त होत असल्याने अद्याप परिस्थिती नियंत्रणात आहे. तरीही रात्रीपर्यंत रेड अलर्ट दिला असल्याने प्रत्येकाने विशेष काळजी घेण्याचे निर्देश शिंदे यांनी यावेळी दिले.

ते पुढे म्हणाले की, ज्या ठिकाणी पावसाचे पाणी घरात शिरून लोकांना धोका निर्माण होण्याची शक्यता आहे अशा जागा आधीच हेरून लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी सारी सज्जता करावी, त्यासाठी पालिकांच्या शाळेतील वर्ग तसेच जेवण आणि पाण्याची सोय करावी. सर्वच आपत्कालीन यंत्रणांनी अलर्ट राहून आपले फोन २४ × ७ चालू ठेवावेत, कोणाचेही फोन आल्यास त्यांना उत्तर द्यावे. वीज महामंडळाबाबत फोन न घेण्याच्या तक्रारी येत असल्याने त्यांनी या सूचनेचे पालन कटाक्षाने करावे, असे सांगितले. तसेच आपत्कालीन सेवांमध्ये काम करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी ऑन फील्ड सज्ज राहावे.

ठाणे, भिवंडी, उल्हासनगर मनपा हद्दीतील धोकादायक इमारतींकडे विशेष लक्ष द्यावे, एखादी इमारत खचल्याची घटना निदर्शनास आल्यास ती इमारत तात्काळ रिकामी करावी, असे निर्देश श्री.शिंदे यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच धरणांच्या पाणी पातळीकडे लक्ष ठेवण्यासाठी विशेष मनुष्यबळ तैनात करावे, असेही सांगितले. मुंबई, ठाणे, भिवंडी आणि महामार्गावर ट्रॅफिक जॅम होऊन लोकांना तासन् तास लागू नयेत, यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष लक्ष द्यावे असे सांगून ते पुढे म्हणाले की, रायगड भागातील पावसाचा अंदाज घेऊन कुठे दरड कोसळण्याची शक्यता वाटल्यास ते गाव तातडीने रिकामे करून लोकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करावे.

मुंबई आणि कोकणातील चार जिल्ह्यांमध्ये सध्या परिस्थिती आटोक्यात असली, तरीही पावसाचा जोर वाढला, किंवा कमी वेळात जास्त पाऊस पडला तरी त्या त्या महानगरपालिकांच्या हद्दीतील परिस्थिती हाताळण्यासाठी सर्वांनी सज्ज राहावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या बैठकीत दिले.

## लक्षवेधी



## कल्याण डोंबिवलीत पावसाची संतत धार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** हवामान खात्याने रविवारी मुसळधार पावसाचा धोका तसेच त्याच बरोबर भरतीच्या वेळी सखल भागात पाणी साचण्याची शक्यता असल्याचा रेड अलर्टचा इशारा दिला होता. त्यानुसार शनिवारी मध्य रात्री पासून संततधार पाऊस पडत असल्याने कल्याण डोंबिवलीकरांनी घरा बाहेर न पडता रविवारी घरी थांबणेच पसंद केले. रेड अलर्ट दिल्याने अतिवृष्टी मुळे शहरात घडणाऱ्या दुर्घटने वर नियंत्रण ठेवण्यासाठी पालिका यंत्रणा २४ तास सज्ज होती.

शनिवारी रात्री पासूनच कल्याण डोंबिवली परिसरात पावसाची संतत धार सुरू असल्यामुळे रात्री पासूनच स्मार्ट सिटी अंतर्गत लावलेल्या सीसीटीव्हीची पाहणी करत, सखल भागात सक्शन पंप आणि एनडीआरएफ टीम तैनात करण्यात आले होते. मात्र दुपारनंतर कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे कल्याणच्या सखल भागामध्ये पाणी साचायला सुरुवात झाली. गरज असेल तरच बाहेर पडा' सुरक्षित राहा, प्रशासनाला सहकार्य करा असे आवाहन केडीएमसी कडून नागरिकांना केल्याने कल्याण डोंबिवलीकर नागरिकांनी घरा बाहेर न पडण्याचा निर्णय घेतल्याने रस्त्यावर तुरळक वाहतूक दिसून येत होती. तर संध्याकाळी कल्याण खाडीचे पाणी वाढल्याने गोविंद वाडी परिसरातील म्हशीच्या तबेल्यातील म्हशी पाणी शिरल्याने सुरक्षित स्थळी हालविण्यात आल्या.

## विरार डहाणू दरम्यान सात नवी स्थानके ?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वसई :** मुंबई रेल्वे विकास महामंडळाने विरार ते डहाणू या ६४ किमी मार्गावर चौपदरीकरणाचे काम सुरू केले आहे. त्याच प्रकल्पाच्या विस्ताराचा भाग म्हणून आता रेल्वे मार्गिकच्या दरम्यान सात नवीन रेल्वे स्थानकांची निर्मिती केली जाणार आहे. यात वाढीव, सरतोडी, माकुणसार, चिंतुपाडा, पांचाळी, वंजारपाडा, बीएसईएस कॉलनी अशा स्थानिकांचा समावेश आहे. चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर आणि आवश्यकतेनुसा नवीन स्थानके टप्प्याटप्याने विकसित केली जाणार आहेत असे रेल्वेकडून सांगण्यात आले आहेमागील काही वर्षांपासून पालघर जिल्ह्याचा परीसर हा झपाट्याने विकसित होत आहे. पालघरच्या विविध ठिकाणच्या भागातून पश्चिम रेल्वेवरून दररोज मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. सध्या विरार आणि डहाणू रोड दरम्यान वैतरणा, सफाळे, केळवे रोड, पालघर, उमरोली, बोईसर आणि वाणगाव ही फक्त नऊ स्थानके आहेत. स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे. विरार मधून साधारपणे ५ ते ६ लाखाहून अधिक प्रवासी आणि डहाणूमध्ये अडीच लाखाहून अधिक प्रवासी प्रवास करतात. याशिवाय वैतरणा आणि बोईसर या स्थानकातूनही प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे.

# बारवी धरणातून विसर्ग सुरु

## नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर :** गेल्या दोन दिवसांपासून होत असलेल्या संत दर पावसामुळे उल्हास नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ होते आहे सकाळपासून उल्हास नदी दुथडी भरून वाहत होती. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास उल्हास नदीवरील कल्याण अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरचा रायते पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला तर बदलापुरातही उल्हास नदीने १६ मिटर ही पाणी पातळी गाठली होती. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता.

हवामान खात्याने दिलेल्या ऑरेंज अलर्टनुसार दोन दिवसांपासून ठाणे, रायगड आणि आसपासच्या परिसरात संततधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहत आहेत.

ठाणे जिल्ह्यात कल्याण, अंबरनाथ या तालुक्यांमध्ये वाहणारी उल्हास नदीच्या पाणी पातळीत गेल्या दोन दिवसात सातत्याने वाढ नोंदवली गेली. रविवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास बदलापुरातील उल्हास नदीची पाणी पातळी १६ मीटरवर पोहोचली होती. उल्हास नदीची इशारा पातळी १६.५० मीटर इतकी आहे. तर नदीची धोका पातळी १७.५० मीटर इतकी आहे. उल्हास नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने बदलापुरातील चौपाटी परिसरात पाणी साचले होते. सतर्कतेचा इशारा म्हणून कुळगाव बदलापूर नगरपालिका, अग्निशमन दल आणि पोलिस प्रशासन सतर्क होते.

ठाणे जिल्ह्याला हवामान विभागाने रेड अलर्ट दिला असून जिल्ह्यात रात्री पासून मुसळधार पाऊस पडत आहे, यामुळे कल्याण तालुक्यातील काळू नदीवरील रुंदे पुल सकाळीच पाण्याखाली गेल्याने १०/१२गावाचा संपर्क तुटला आहे, तर बारवी नदीवरील दहागाव पुल लवकरच पाण्यात बुडून रायते बदलापूर रस्ता बंद होणार आहे. तसेच कल्याण मुरबाड मार्गावरील उल्हास नदीच्या पाण्याच्या पातळीत झपाट्याने वाढ होत असल्याने हा पुल देखील वाहतुकीसाठी बंद करण्यात येईल असे कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांनी सांगितले. सध्या ठाणे जिल्हासह तालुक्यात मुसळधार पाऊस पडत आहे, यामुळे काळू, भातसा, उल्हास आणि बारवी नदीला पूर आला आहे, हा पूर तिसऱ्यांदा आला असून यामुळे रुंदे सह१०ते१२गावांचा संपर्क तुटला आहे, टिटवाळा बदलापूर ला जोडणारा दहागाव येथील बारवी नदीचा पुल लवकरच पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे.खडवली जवळील भातसा दुथडी भरून वाहत आहे, रायते येथील उल्हास नदी देखील मोठ्या प्रमाणात भरुन वाहत आहे.

सध्या या पुलाच्या मो-यांना पाणी लागले आहे, त्यामुळे पाणी असेच वाढले तर कल्याण मुरबाड मार्गावरील रायते पुल वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येईल असे कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांनी सांगितले, त्यामुळे नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. तर रस्त्यावर ठिक ठिकाणी खड्डे पडले असून यामुळे वाहने बंद पडत आहेत,याचा त्रास प्रवासी, वाहनचालक, नागरिक यांना होत आहे.



# भातसा धरणाचे पाचही दरवाजे उघडले

## शहापुर तालुक्यात अनेक गावांचा संपर्क तुटला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

■ **बातमीदार**

**शहापूर :** शनिवार रात्रीपासून शहापूर तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबई महानगराला पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा, तानसा, मोडकसागर आणि मध्य वैतरणा धरणांतून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू झाला असून, त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. भातसा धरणाचे पाचही दरवाजे तब्बल साडेतीन मीटरने उघडण्यात आल्याने, सापगाव येथील भातसा नदीच्या पुलावरून पाणी वाहू लागले असून, पुलाच्या पलीकडील अनेक गावांचा शहापूर शहराशी संपर्क तुटला आहे आणि जनजीवन विस्कळीत झाले आहे. या मुसळधार पावसामुळे भातशेतीसोबतच भाजीपाला व फळझाडांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकरी हवालदिल झाले आहेत.

### भातसा धरणातून ६५ हजार ८१४ क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग

शहापुर तालुक्यात पावसाचा जोर कायम राहिल्याने धरणातील पाण्याची पातळी नियमित राहण्यासाठी भातसा धरणाचे पाचही दरवाजे तब्बल साडेतीन मीटरने उघडण्यात आले आहेत. त्यामुळे भातसा धरणातून तब्बल ६५ हजार ८१४ क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग होत असल्याने सापगाव येथील भातसा नदीच्या पुलावरून पाणी वाहू लागले. त्यामुळे पुला पलीकडील शेणवा, किन्हवली, डोळखांब, मुरबाड मार्गावरील अनेक गावांचा शहापुर शहराशी संपर्क तुटला असून जनजीवन विस्कळीत झाले. दरम्यान, मुसळधार पावसामुळे मुंबई महानगराला पाणी पुरवठा करणाऱ्या तानसा धरणातून ४१ हजार ९९९, मोडकसागर धरणातून ६२ हजार २६७, मध्य वैतरणा धरणातून २२ हजार ४२५ क्यूसेक्स इतका पाण्याचा विसर्ग होत असल्याचे शहापुर तहसील कार्यालयाकडून सांगण्यात आले.

## धसई जिल्हापरिषद शाळेची संरक्षक भिंत कोसळली

मुसळधार पावसामुळे धसई जिल्हापरिषद शाळेची संरक्षक भिंत कोसळली असून या व्यतिरिक्त तालुक्यात कोणतीही दुर्घटना झाली नसल्याचे महसूल विभागाकडून सांगण्यात आले. सापगाव येथील भातसा नदीवरील पूल, पिवळी कांबारे, व वासिंद भातसई मार्गावरील पूल आणि चरिव येथील कानवी नदी वरील पुलावरून पाणी वाहू लागल्याने या पुलावरून खासगी वाहनांसह महामंडळाच्या बसेसची होणारी वाहतूक पूर्णतः बंद करण्यात आली आहे. महसूल विभागाकडून तालुक्यातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, जनावरांना चारण्यासाठी घेऊन जात असताना विजेच्या पोलवरील विजवाहक तार तुटून बैलाच्या अंगावर पडल्याने जोरदार शॉक लागून बैलाचा तडफडून मृत्यू झाल्याची घटना शहापूर तालुक्यातील बिरवाडी येथे शनिवारी घडली. सुदैवाने शेतकरी शांताराम भेरे यांचा जीव वाचला.







## वाचक मनोगत

# गर्दीच्या व्यवस्थापनात आपण अपयशी?


दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेते आणि नव्यानेच राजकारणात प्रवेश केलेले तमिळगा वेत्री कळघम या पक्षाचे प्रमुख विजय थलपती यांनी आयोजित केलेल्या सभेत चेंगराचेंगरी होऊन ३९ जण मृत्युमुखी पडले आणि १२ जण गंभीर जखमी झाले. शनिवारी रात्री घडलेल्या या दुर्घटनेचा व्हिडिओ प्रसार माध्यमात व्हायरल झाला. ही दुर्घटना जितकी धक्कादायक आहे तितकीच ती चिंताजनक आहे. कारण भररस्त्यात आयोजित केलेल्या या सभेत तब्बल ६० हजारांहून अधिक नागरिक उपस्थित होते. अतिशय छोट्या जागेत इतक्या मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहत असतील तर दुर्घटना घडेल हे शाळकरी मुलेही सांगतील. अभिनेते विजय यांनी पहिल्यांदाच अशी सभा केली असे नाही तर याआधीही त्यांनी काही दिवसांपूर्वी अशी रॅली आयोजित केली होती त्यातही लाखो नागरिकांची उपस्थिती होती तेंव्हाच अशी काही दुर्घटना घडली तर काय होईल अशी भीती व्यक्त करण्यात आली होती दुर्दैवाने ती भीती आता खरी ठरली अर्थात ही आपल्या देशात चेंगराचेंगरीची पहिली दुर्घटना नाही. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत. सध्या तर अशा दुर्घटनांची मालिकाच सुरू आहे. काही दिवसांपूर्वी बंगळुरू मध्ये झालेली चेंगराचेंगरीची दुर्घटना अजूनही ताजीच आहे. जून महिन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले होते. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळीही अशीच चेंगराचेंगरी झाली त्यात ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३० हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले होते. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली होती. आताही तशीच शोककळा देशभर पसरली आहे. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. या सभेला पोलिस आणि प्रशासनाने परवानगी दिली होती का ? कोणतीही सभा मोठ्या मैदानावर आयोजित केली जाते मग ही सभा रस्त्यावर का घेण्यात आली ? या सभेसाठी मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहणार याची कल्पना आयोजकांना आली नाही का? ज्या जागेची क्षमता वीस ते तीस हजार आहे तिथे दुप्पट नागरिक कसे जमा झाले ? ही सभा आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का ? इतकी मोठी सभा आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाशी, पोलिसांशी चर्चा केली होती का ? या सभेला अपेक्षेपेक्षा अधिक नागरिक जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का ? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेशे पोलिस बळ होते का ? ही राजकीय पक्षाची सभा होती. स्वतःचे राजकीय शक्तिप्रदर्शन दाखवण्यासाठी नागरिकांचा जीव धोक्यात घालणे कितपत योग्य? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ३९ नागरिकांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण ? आयोजक, तमिळनाडू सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही नागरिक? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सवप्रिय तसेच व्यक्तिपूजक आहेत. विशेषतः दक्षिणेत तर व्यक्तिपूजेचे मोठे अवडंबर आहे. यात तरुणांची संख्या अधिक आहे. नेते, अभिनेते यांना दैवत मानून त्यांच्या सभेत सहभागी होण्याची यांना फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ३९ नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड - जिल्हा पुणे**




### आठवा दिवस : आठवी माळ

# आजची देवी : श्री महागौरी



नवरात्र हा भारतातील सर्वात महत्वाचा आणि शुभ सण आहे. जगभरातील हा सण साजरा केला जातो. जो दुर्गा देवीच्या नऊ रूपांना समर्पित आहे. नवरात्री हा शब्द संस्कृत भाषेतून आला आहे. नव' म्हणजे 'नऊ' आणि 'रात्री' म्हणजे 'रात्र'. तर नवरात्री देवीची 9 रूपे कोणती आहेत जाणून घ्या. शरद ऋतूत महत्त्वाचे सण म्हणजे नवरात्रोत्सव, दसरा, कोजागिरी पौर्णिमा, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, पाडवा, भाऊबीज... असे येतात. सुरुवात होते आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून, म्हणजे घटस्थापनेपासून. आदिमाया, आदिशक्तीच्या उपासनेचे नऊ दिवस म्हणजे नवरात्रींचा उत्सव. या उत्सवाची रंगत सर्व उत्सवांपेक्षा वेगळी आहे. घरात, मंदिरात, मंडपात दुर्गामातेची प्रतिष्ठापना करतात. या उत्सवाचा संबंध थेट बळिराजाच्या कष्टाशी आहे, कष्टकरी शेतकऱ्यांच्या साध्याभोळ्या संस्कृतीशी आहे. घटस्थापना म्हणजे बीजपरीक्षण! वावरात जी पिकं घेतली जातात, त्यापासून अन्नधान्य मळतं. त्या काळ्या आईच्या उपकारांची जाणीव ठेवणं, कृषिवलांचे ऋण मान्य करणं, कृतज्ञता मानणं, धन्यवाद देणं म्हणून हे नऊ दिवस! नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये आदिशक्ती दुर्गेच्या नऊ रुपांची पूजा केली जाते. ही नऊ रूपे नवदुर्गा म्हणून ओळखली जातात.

## महागौरी

अष्टमी किंवा नवरात्रीचा आठवा दिवस हा बैल किंवा पांढऱ्या हत्तीवर स्वार होऊन हातात त्रिशूल आणि डमरू घेऊन चार हात असलेली देवी महागौरी यांना समर्पित आहे. तिचा आवडता रंग मोर हिरवा आहे. महागौरीला भाविक नारळ अर्पण करतात. हिंदू धर्मातील महादेवीच्या नऊ रूपांच्या नवदुर्गा मध्ये महागौरी हे आठवे रूप आहे. नवरात्रीच्या आठव्या दिवशी तिची पूजा केली जाते. महागौरी तिच्या भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण करण्यास सक्षम असल्याचे मानले जाते.

महागौरी या नावाचा अर्थ अत्यंत तेजस्वी, स्वच्छ-शुभ्र, चंद्रासारखी चमक असलेली असा होतो. (महा = महान; गौरी = तेजस्वी, स्वच्छ). महागौरी ही पांढऱ्या बैलावर स्वार पांढऱ्या वस्त्रांमध्ये दाखवली जाणारी पवित्रतेची प्रतीक आहे.[२] तिला चार हातांनी चित्रित केले आहे: तिच्या उजव्या वरच्या हातात त्रिशूळ आहे आणि डाव्या हातात डमरू आहे. अभयमुद्रेमध्ये तिचा उजवा हात आहे.

**महागौरी देवीचा मंत्र:**
ॐ देवी महागौर्यै नमः॥ ॥


**महागौरी देवीची प्रार्थना:**
श्वेते वृषेसमारूढा
श्वेताम्बरधरा शुचिः ।
महागौरी शुभं दद्यान्महादेव
प्रमोददा ॥

**महागौरी पूजन पद्धत**

निमिषा प्रिया प्रकरणात काय प्रगती झाली आहे, यमनमधील फाशीच्या...

नवरात्रीत अष्टमीला सकाळी लवकर उठून आंघोळ वगैरे करून स्वच्छ कपडे घाला. देवीच्या मूर्तीला गंगाजल किंवा शुद्ध पाण्याने स्नान घालावे. देवीला पांढऱ्या रंगाचे कपडे अर्पण करावेत. धार्मिक मान्यतेनुसार देवीला पांढरा रंग आवडतो. देवीची आंघोळ केल्यावर पांढरे फूल अर्पण करावे. महागौरीला हळद-कुंकू लावावे. देवीला मिठाई, सुका मेवा, फळे अर्पण करा. महागौरी मातेला काळे हरभरे अवश्य अर्पण करा. माता महागौरीचे शक्य तितके ध्यान करावे. तसेच देवीची आरती करावी. नैवेद्य अर्पण करावा. अष्टमीच्या दिवशी कन्या पूजनालाही विशेष महत्त्व आहे. लक्षात ठेवा की मुलींचे वय २-१० वर्षांच्या दरम्यान असावे आणि त्यांची संख्या ९ असावी.



# भाऊसाहेब नेने महाविद्यालयात 'हिंदी दिवस साजरा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण/प्रतिनिधी :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात हिंदी विभाग, हिंदी अनुवाद प्रमाणपत्र कोर्स व डी.एल.एल.ई. युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने 'हिंदी दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी बँक ऑफ महाराष्ट्र, पेण शाखेचे शाखा प्रबंधक नितेश विश्वकर्मा यांनी "बँकिंग क्षेत्रात हिंदी भाषेचं महत्त्व" या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी हिंदीतून रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.समारंभाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने झाले. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी हिंदी ही केवळ संवादाचे साधन नसून संस्कृतीचा आत्मा असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांमध्ये सहभागाचे आवाहन केले.

या वेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांनी शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या हस्ते 'दर्पण' भित्तीपत्रिकेचे अनावरण करण्यात आले. तसेच डॉ देवीदास बामणे यांनी स्वरचित "हिंदी मेरी पहचान" ही कविता सादर करून हिंदीचे महत्त्व अधोरेखित केले.यानंतर काव्य वाचन व शेर शायरी स्पर्धा पार पडली. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील 11 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. गुंजनकुमारी ठाकूर (टी.वाय.बी.एस्सी.)द्वितीय क्रमांक कु. शिखा अमरनाथ यादव (इ. 11 वी, पेण प्रायव्हेट हायस्कूल) तृतीय कु. हर्षल राजेंद्र पाटील (टी. वाय.बी.एस्सी.)हे विजेते ठरले. मान्यवरांच्या हस्ते त्यांना बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात आली. स्पर्धेचे परीक्षण प्रा. हिरामण देवराम टोंगारे यांनी केले.यावेळी प्रा.अस्मिता पाटील, प्रा. सुप्रिया धुमाळ, प्रा. राधिका गोंधळी विविध शाखेतील प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. देवीदास बामणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सुषमा खोत यांनी केले.

### नवरात्रौत्सवावर मुसळधार पावसाची " बरसात "

# दांडीया प्रेमींच्या आनंदावर विरजण

**मुसळधार पावसामुळे उत्सव मंडळाचे पदाधिकारी चिंताग्रस्त**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी/शरद भसाळे :** भिवंडी शहर परिसरात सार्वत्रिक नवरात्र उत्सवाची मोठ्या धुमधडाक्यात सुरुवात झालेली आहे. ठिकठिकाणी " दुर्गा माता " मुर्ती ची स्थापन करून होमहवन धार्मिक कार्यक्रम व रात्रीच्या वेळी गरबा दांडिया कार्यक्रम होत आहेत मात्र गेल्या दोन दिवसापासून दिवसा व रात्री सतत पडत असलेल्या रिमझिम तर काही वेळ पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे कार्यक्रमाचा विचका झाला आहे. अनेक ठिकाणी गरबा दांडिया खेळण्यासाठी रात्री जमा झालेल्या तरूण व तरूणांना दांडीया खेळता येत नसल्यामुळे युवक व युवतींचा आनंद व उत्साहावर पावसाने विरजन फिरवले आहे.रात्री पासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे दुर्गादेवी मुर्ती ला पावसामुळे नुकसान होऊ नये यासाठी कापडी मंडपावर पुन्हा प्लास्टिक ताडपत्री सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून बांधली असून काही ठिकाणी पूरजन्य परिस्थिती निर्माण होणार असल्यामुळे नवरात्र उत्सव मंडळाचे पदाधिकारी चिंताग्रस्त झाले आहेत.तर मुसळधार पाऊस पडत असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने भिवंडी मनपाचे आपत्कालीन विभागाचे कर्मचारी व पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस यंत्रणा सतर्क होऊन गस्त घालीत आहे. शहरातील अशोकनगर, पारनाका बाजारपेठ, कामतघर, कोंबडपाडा, पद्मानगर, काप आळी, अंबिका नगर,कासार आळी,अजयनगर, भादवड, मानसरोवर अशा विविध ठिकाणी नवरात्रौत्सवा निमित्ताने स्थापना करण्यात आलेल्या दुर्गा देवीच्या मूर्ती, प्रतिमा व घटस्थापनाची दररोज पूजा व होमहवन सारखे धार्मिक कार्यक्रम केले जात आहेत रात्रीच्या वेळी गरबा दांडिया खेळल्यानंतर महाआरती करून देवीसाठी जागरण केले जात आहे. मात्र गेल्या दोन दिवसापासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे येथील उत्सवावर आनंदावर पाणी फिरले असून धार्मिक पुजन करून आरती करून कार्यक्रमाचा समारोप केला जात आहे. शनिवारी दुपार पासुन पडत असलेल्या पावसामुळे भिवंडी शहर व ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले असुन ठिकठिकाणी सखल भागात पावसाचे पाणी रस्त्यावर साचल्याने पुरजन्य परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे वाहतूक व्यवस्था संथगतीने होत असुन भिवंडी ठाणे महामार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.तर तीनबत्ती चौक, शिवाजी नगर भाजीपाला मार्केट, पद्मानगर, होलीमेरी हायस्कूल रोड, कणेरी,म्हाडा कॉलनी,दरगाह इदगाह रोड अशा विविध रस्त्यावर पाणी साचल्याने अनेक दुकानदार व रहिवासी नागरिकांचे हाल झाले आहेत. काही ठिकाणी वादळी पावसामुळे झाडे रस्त्यावर पडल्याने आपत्कालीन व्यवस्थापन विभागाचे अधिकारी शाकीब खरबे यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेऊन मार्ग मोकळा केला आहे तसेच पावसाचा अंदाज घेऊन नदी किनारी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क रहावे असे आवाहन भिवंडी उपविभागीय अधिकारी अमित सानप व तहसीलदार अभिजित खोले यांनी केले आहे.

# बालविवाह जनजागृतीसाठी पोलीसांचा पुढाकार

**पेण पोलिस ठाण्याचे आदिवासी वाड्यांवर समाजप्रबोधन**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** समाजातील बाल विवाह या अनिष्ट प्रथेला लगाम घालण्यासाठी रायगड पोलिसांनी ठोस पावले उचलली आहेत. पेण पोलिसांनी थेट आदिवासी वाड्या चढत तालुक्यातील १७ आदिवासी वाड्यांवर बाल विवाह समाजासाठी कसा हानिकारक ठरत आहे ते मार्गदर्शनात्मक जनजागृतीतून स्पष्ट केले आहे. "उत्सव नवरात्रीचा - जागर नारी शक्तीचा" या संकल्पनेवर आधारित, पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २२ सप्टेंबर ते ०१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान बालविवाह विरोधी जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे.

या मोहिमेचा उद्देश ग्रामीण भागातील वाढते बालविवाह आणि त्यासोबतच दाखल होणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालणे हा आहे. या उपक्रमांतर्गत पेण पोलीस ठाणे अंतर्गत ग्रामीण भागांमध्ये विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात पोलीस अधीक्षक आँचल दलाल, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर



नालकुल, पोलिस निरक्षक संदिप बागुल, शांतता कमिटी सदस्य, पोलीस पाटील, आशा सेविका आणि स्थानिक सामाजिक संघटनांचे पदाधिकारी यांचा सक्रिय सहभाग होता. कार्यक्रमादरम्यान नागरिकांना बालविवाहाचे दुष्परिणाम, कायद्याचे कठोर तरतुदी आणि नारी सक्षमीकरणाबाबत माहिती देण्यात आली.

उपस्थितांनी या सामाजिक वाईट प्रथेविरोधात एकत्र येऊन लढण्याचा निर्धार व्यक्त केला. रायगड जिल्ह्यातील बालविवाह निर्मूलनाच्या उद्देशाने जिल्हा पोलिस अधीक्षक आँचल दलाल यांनी थेट पेण आदिवासी वाड्यांना भेट देत जनजागृती केली. स्थानिक आदिवासी बांधवांशी संवाद साधत बालविवाह समाजासाठी किती घातक आहे, हे समजावून सांगितले. बालविवाहामुळे मुलामुलींच्या शिक्षणावर, आरोग्यावर आणि भावी आयुष्यावर होणारे दुष्परिणाम त्यांनी ठळकपणे मांडले. यावेळी पोलीस अधीक्षकांनी आदिवासी समाजाने आजवर एकोप्याने कसे जगले आहे आणि त्यांना कायदेशीर न्याय व हक्क मिळण्यासाठी काय सुविधा उपलब्ध आहेत, याचीही माहिती दिली.

उदाहरणांद्वारे त्यांनी बालविवाहाचे गंभीर परिणाम समजावून देत त्याचे तोटे स्पष्ट केले. हा उपक्रम समाजप्रबोधनाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचा ठरला असून, स्थानिकांनीही या जनजागृती उपक्रमाचे स्वागत केले.

# अनुदानित आश्रमशाळा सेवक पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ओझर:ता. २८,** ओझर (ता. जुन्नर) येथील आर्या रिजेन्सी मध्ये अनुदानित आश्रमशाळा सेवक सहकारी पतसंस्था नारायणगाव (ता. जुन्नर) यांची २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार ता. २८ सप्टेंबर रोजी खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी मुख्याध्यापक सुदाम पवार, जीवन वाडेकर, शिवाजी भोर, तुकाराम गायकर, गणेश नलावडे, पंढरीनाथ भाईक, खजिनदार अविनाश घोलप, संचालक महादेव डोळे, रविंद्र काकडे, संजय गायकवाड, संजय हांडे तसेच मुख्याध्यापक व सभासद उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते श्रीगणेशाची पूजा व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली सभेला सुरुवात झाली. यावेळी संस्थेचे संस्थापक व सचिव विजय नवले यांनी अहवाल वाचनात सन २०२४-२५ चा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक वाचून कायम केले. संस्थेचे भागभांडवल १ कोटी ६९ लाख ३७ हजार ९०० रुपये इतके असून १ कोटी २७ लाख ७७ हजार ३२० रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेला यावर्षी २५ लाख ७४ हजार ७७२ रुपये निव्वळ नफा झाला असून यावर्षी सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला असून लेखापरीक्षणात संस्थेला यावर्षी 'अ' वर्ग प्राप्त झाल्याचे सांगितले. यावर अनेक सभासदांनी आपली मनोगते व्यक्त करत संस्थेच्या कारभारावर समाधान व्यक्त केले.

यावेळी सभासद पाल्य गुणगौरव सोहळ्यात दहावी व बारावीतील मार्च २०२५ मधील गुणवंत सभासद पाल्यांचा सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह, शाल, गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन संचालक भरत नाईकवाडी यांनी केले व आभार उपाध्यक्षा उज्वला थोरात यांनी मानले.

## भविष्यवेध



**सोमवार**
**२९ सप्टेंबर २०२५**

**मेष**
करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. दुसऱ्यांच्या शब्दावर विसंबून तुम्ही गुंतवणूक केलीत तर आज आर्थिक तोटा होण्याची शक्यता आहे.

**वृषभ**
तुम्हाला आज काही समस्या उद्भवतील पण वास्तववादी राहा आणि मदत करणाऱ्या लोकांकडून चमत्कार घडेल अशी अपेक्षा बाळगू नका.

**मिथुन**
आपल्या प्रिय व्यक्तीशी व्यक्तिगत भावना, गुपित शेअर करण्यासाठी हा काळ चांगला नाही. ऑफिस मध्ये लवकर सुट्टी होऊ शकते.

**कर्क**
आपल्या कुटुंबातील लोकांसोबत कुठे फिरायला जाऊ शकतात. तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल.

**सिंह**
धनाचे आगमन आज तुम्हाला बऱ्याच आर्थिक परिस्थितीतून दूर करू शकते. कुटुंबाची आघाडी आनंदी आणि सुरळित असणार नाही.

**कन्या**
काही रोचक मॅगझीन किंवा उपन्यास वाचून तुम्ही आजचा दिवस चांगल्या प्रकारे व्यतीत करू शकतात. दिवसाची सुरवातीत वाईट वार्ता मिळू शकते.

**तुळ**
नाला काबूत ठेवण्याचा प्रयत्न करा.आज एकदम शांततेत राहाल आणि मौजमजा करण्याचा तुमचा मूड बनेल. तुमची समस्या चव्हाट्यावर आणू नका.

**वृश्चिक**
आअज तुमची बदनामी होण्याची शक्यता अधिक आहे. आजच्या दिवशी अनुकूल ग्रहांनी तुम्हाला खुश करण्याची अनेक कारणे आहेत. आनंदी दिसाल.

**धनु**
ज्ञानी पुरुषाला भेटून तुम्हाला तुमच्या बऱ्याच समस्यांचे आज निराकरण होऊ शकते. मद्यपानाच्या सवयीवर ताबा मिळविण्यासाठी शुभ दिवस आहे.

**मकर**
आजच्या दिवशी धन हानी होण्याची शक्यता आहे म्हणून देवाण-घेवाणीच्या गोष्टींमध्ये जितके तुम्ही सतर्क राहाल तितकेच तुमच्यासाठी चांगले असेल.

**कुंभ**
आजचा दिवस अत्यंत महान आहे, कारण तुमच्या कामाकडे लक्ष जाईल, ते तुम्हास हवे असेल. आज आपल्यावर काबू ठेवला पाहिजे, धनाची बचत केली पाहिजे.

**मिन**
एकमेकांचा दृष्टिकोन समजावून घेऊन वैयक्तिक प्रश्न सोडवा. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल. नोकरीत वरिष्ठांचा सहयोग मिळेल.



# खारघर शहरात गॅरेज व्यावसायिकांवर कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खारघर, ता. २८ :** सुट्टीदिनी खारघरध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूला गॅरेज व्यावसायिक हे पदपथ आणि रस्ते अडवून वाहने दुरुस्त करतात. यामुळे या रस्त्यावर वाहतूक कोंडी होत असते. वाहतूक विभागाकडून पदपथ आणि रस्ते अडवून व्यवसाय करणाऱ्या गॅरेज व्यावसायिकांवर कारवाई करण्यात येत आहे. यामुळे गॅरेज व्यावसायिकांचे धाबे दणाणले.

शनिवार आणि रविवारी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी खारघरमधील उत्सव चौककडून भारती विद्यापीठाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला गॅरेज व्यावसायिक हे पदपथ आणि रस्ते अडवून वाहने दुरुस्त करतात. यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. दरम्यान, मागील आठवड्यात वाहतूक विभागाने जवळपास शंभराहून अधिक वाहनांवर दंडात्मक कारवाई केली होती. शनिवार (ता. २७) राबविलेल्या मोहिमेत नो पार्किंग जागेत वाहने उभी केलेल्या २१८ वाहनावर ऑनलाइन दंडात्मक कारवाई करण्यात आली, तर या वेळी भाडे नाकारणाऱ्या रिक्षाचालक, विनाहेल्मेट व ट्रिपल सीट दुचाकी वाहनावर कारवाई करण्यात आली आहे. खारघर वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जमील शेख म्हणाले, रस्त्यावर वाहने उभी करून वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर नियमितपणे कारवाई केली जात आहे.



## शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान तर्फे
# घोटसईत दुर्गा माता दौडचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण तालुक्यातील घोटसई गाव येथे श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान तर्फे गेली सात वर्षे श्री दुर्गा माता दौड निघत असून यंदाच्या आठव्या वर्षीही अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात ही दौड निघाली. पावसाच्या सततधारेला न जुमानता धारकऱ्यांनी पुर्ण गावात श्री दुर्गा माता दौड काढली.

प्रथम गावातील कान्होबा मंदिर येथून श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीला हार घालून, माजी सरपंच श्री राजू मगर यांनी ध्वज चढवून दौडला सुरुवात केली. मान्यवरांच्या हस्ते शस्त्र पुजा करून गावातील दुर्गा माता मंडळांना भेटी देत दौड पुर्ण गावात फिरून आली.

छत्रपतींचा जयघोष करत, देव देश धर्मपर गीत घेत दौड शिस्तबद्ध पद्धतीने गावात फिरली. पुन्हा कान्होबा मंदिर येथे आरती घेऊन सरपंच सौ. दया रविंद्र मगर यांच्या हस्ते ध्वज उतरवून दौडीची सांगता झाली.

# डहाणू स्थानकाजवळ अमृतसर एक्सप्रेसचे दोन डबे वेगळे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबईहून अमृतसरकडे निघालेल्या अमृतसर सुपरफास्ट एक्सप्रेसचे पश्चिम रेल्वेच्या डहाणू रेल्वे स्थानकाजवळ दोन डबे निघाल्याची घटना समोर आली आहे. आज दुपारी 1 वाजून 8 मिनिटांनी वाजताच्या सुमारास अमृतसरकडे जाताना डहाणूजवळ हे दोन डबे निघाले. यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरल्याचे पाहायला मिळाले. मुंबई उपनगर ठाणे आणि पालघर या भागांमध्ये आधीच मुसळधार पावसामुळे रेल्वे वाहतूक विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळाले. त्यातच पश्चिम रेल्वेचा हा निष्काळजीपणा पुन्हा एकदा समोर आला आहे.

सुदैवाने या घटनेनंतर मोठी दुर्घटना टळली. मात्र याचा थेट परिणाम डहाणूपर्यंत धावणाऱ्या लोकल आणि लांब पल्ल्यांच्या कड्यांवर झाल्याचा पाहायला मिळाले आहे. डाऊन मार्गावरील गाड्या तब्बल 40 मिनिटे रोखण्यात आल्या. यानंतर हे डबे पुन्हा एकदा जोडून अमृतसर एक्सप्रेस गुजरातकडे रवाना करण्यात आली. एक वाजून पन्नास मिनिटांनी ट्रेन अमृतसरकडे रवाना झाली आहे. मात्र या घटनेमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागला आहे.

डहाणू रेल्वे स्थानकाजवळून जाणाऱ्या अमृतसर एक्स्प्रेसचे दोन डबे अचानक वेगळे झाल्याची महत्त्वपूर्ण घटना समोर आली आहे. या घटनेमुळे रेल्वे प्रवाशांमध्ये मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, डहाणू रेल्वे स्थानकाजवळून जात असताना अमृतसर एक्स्प्रेसचे दोन डबे मुख्य रेल्वेपासून वेगळे झाले. ही बाब रेल्वे कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास येताच, कोणतीही वेळ न घालवता रेल्वे तात्काळ थांबवण्यात आली. यामुळे एक मोठी दुर्घटना टळली, ज्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला.

सध्या या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीती कायम असली तरी, सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा मोठी हानी झालेली नाही. रेल्वे प्रशासनाने तात्काळ पावले उचलल्यामुळे संभाव्य गंभीर धोका टळला. या घटनेच्या कारणांचा तपास सुरू असून, अशा घटना भविष्यात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत.



## ठाणे , रायगड जिल्ह्यातील
# भात उत्पादक शेतकरी संकटात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दोन दिवस सतत पडणाऱ्या पावसाने भातशेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. सप्टेंबर अखेरीसही पावसाचा जोर कायम असल्याने भाताचे कोठार असा लौकिक असलेल्या जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल आहे.

भाताची रोपे अक्षरशः कोलमडून पडली असून, पिके पाण्याखाली गेली आहेत. सततच्या पावसाने झालेले नुकसान भरून काढण्याचा प्रयत्न सुरू असताना पुन्हा आलेल्या पावसाने शेतकरी हवालदिल झाला आहे. कर्जत तालुक्यातील भातशेती ही फक्त उत्पन्नाचे साधन नसून घरगुती धान्य आणि शेतीची परंपरा जपण्यासाठी घेतली जाते, मात्र हेक्टरी लागणारा खर्च आणि मिळणारे उत्पादनाचा ताळमेळ नसताना नैसर्गिक आपत्तीने सर्व गणित कोलमडून टाकले आहे. शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, कर्जफेड करणे कठीण झाले आहे. पिके नष्ट झाल्यामुळे उत्पन्नाचे स्रोत बंद झाले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी होत आहे, मात्र पंचनाम्यानंतर प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या हातात कधी येईल, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

> भातपीक तयार होत असल्याने पावसाचे प्रमाण कमी होणे गरजेचे होते. सतत पडत असलेल्या पावसाने पिकाचे नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे. प्राथमिक अंदाजानुसार किती हेक्टरमध्ये नुकसान झालेले आहे, हे सांगता येणे कठीण आहे.
> ■ वंदना शिंदे, जिल्हा कृषी अधिक्षक

**उपजीविकेचा प्रश्न**

कर्जत तालुक्यातील परिस्थिती अतिशय गंभीर असून, शासनाने आर्थिक मदत, कर्जमाफी, आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज आहे. ओला दुष्काळ जाहीर करून मदतीची प्रक्रिया गतिमान करावी, अशी मागणी होत आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी तातडीने कार्यवाही झाली नाही, तर आगामी काळात उपजीविकेवर संकट ओढवण्याची परिस्थिती आहे. हस्त नक्षत्रात वरुणराजाचे वाहन मोर असून, पावसाचा जोर वाढल्याने भातपिकावर परिणाम होण्याच्या भीतीने खालापुरातील बळीराजा चिंतित आहे.

## तळीरामांचा वैताग !
# डोंबिवलीतील पेट्रोलपंप रात्रीच्या वेळेस बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली -** रात्रीच्या वेळेत पेट्रोल पंपावर मोटारी, दुचाकी पेट्रोल भरण्यासाठी घेऊन येणारे काही दुचाकी स्वार तरूण, मोटार कार चालक मद्य सेवन करून येतात. पेट्रोल वाहनात भरून झाले की मग पैसे देण्यावरून पेट्रोल भरणा सेवक कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालून त्यांना दमदाटी, मारहाण करून पेट्रोलचे पैसे न देता निघून जातात. या वाढत्या प्रकाराला कंटाळून डोंबिवली पश्चिमेतील राजूनगर-गणेशनगर भागातील पेट्रोल पंप मालक सुरेश मोरे यांनी आपला पेट्रोल पंप रात्री ११ ते सकाळी सहा वेळेत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

दिवसाही या पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी काही तरूण, इसम आले की ते किरकोळ कारणावरून वाहनात पेट्रोल भरणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालत असल्याच्या वाढत्या तक्रारी आहेत. रात्रीच्या वेळेत पुरूष कर्मचारी पेट्रोल पंपावर तैनात असतात. डोंबिवली पश्चिमेत राजूनगर, भागशाळा मैदान भागात पेट्रोल पंप सुरू झाल्यामुळे वाहन चालकांना डोंबिवली एमआयडीसी किंवा अन्य भागात जाण्याचा त्रास कमी झाला आहे.

मागील काही महिन्यांपासून राजूनगर भागातील सुरेश मोरे यांच्या पेट्रोल पंपावर रात्री, मध्यरात्रीच्या वेळेत काही दुचाकी, मोटार




कार चालक आपली वाहने पेट्रोल भरण्यासाठी घेऊन येतात. मद्य सेवन केलेले, धुंदीत असलेले हे वाहन चालक पेट्रोल वाहनात भरणा केल्यावर पैसे देताना पेट्रोल भरणा सेवकाशी हुज्जत घालून त्याला मारहाण, दमदाटी करतात. पेट्रोल पंप हे संवेदनशील ठिकाण आहे. याठिकाणी पेट्रोल विक्रीच्या माध्यमातून ग्राहक सेवेतून मिळणारे पैसे जमा झालेले असतात.

मद्य सेवन केलेले वाहन चालक त्याचा विचार न करता पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालून आणखी भाई लोक पेट्रोल पंपावर हाणामारी करण्यासाठी बोलावून घेतात. पेट्रोल पंपाच्या ठिकाणी मोबाईल वापरण्यास बंदी आहे. तुम्ही याठिकाणी बोलू नका, असे कर्मचाऱ्याने सांगुनही ते त्याला तू कोण मला सांगणार, असे बोलून मारायला धावतात. हा वाद सुरू असताना वाहनात पेट्रोल भरले आहे त्याचे पैसे देण्यास मद्य धुंद वाहन चालक पैसे देण्यास तयार होत नाहीत.

रात्रीच्या वेळेत तीन ते चार कर्मचारी पेट्रोल पंपावर तैनात असतात. मोटार वाहनात पाच ते सहा गुंड प्रवृत्तीचे लोक पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी आलेले असतात. हे लोक कर्मचाऱ्याशी वाद घालून समुहाने कर्मचाऱ्यावर हल्ला करण्याची शक्यता असते. या हाणामारीत एखाद्या कर्मचाऱ्याच्या जीवाला धोका निर्माण शक्यता आहे. हा सगळा विचार करून आपल्या पेट्रोल पंपावर रात्रीच्या वेळेत मद्य सेवकांकडून कर्मचाऱ्यांना होणारा त्रास विचारात घेऊन पेट्रोल पंप मालक सुरेश मोरे यांनी आपला राजूनगर भागातील पेट्रोल पंप रात्री ११ ते सकाळी सहा वेळेत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. तसा फलक त्यांनी पेट्रोल पंपाच्या प्रवेशव्दारावर लावला आहे. मद्य सेवकांच्या कृतीचा इतर वाहन चालकांना नाहक त्रास होणार असल्याने इतर प्रवासी नाराजी व्यक्त करत आहेत.

# महाराष्ट्रात बीएसएनएलचे स्वदेशी ४जी नेटवर्क

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** महाराष्ट्रात बीएसएनएलचे स्वदेशी ४जी नेटवर्क सुरू होत असून, राज्यात १० ते २० हजार नवीन टॉवर्स उभारले जाणार आहेत. यामुळे ग्रामीण व दुर्गम भागांतील नागरिकांना उत्तम इंटरनेट सुविधा मिळणार असून, शिक्षण, आरोग्यसेवा (टेलीमेडिसीन) व पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिदि यांनी व्यक्त केला आहे.

ठाण्यात स्वयं पुनर्वसन दिव्यांग केंद्र व जिल्हा दिव्यांग केंद्राच्या वतीने दिव्यांग बांधवांना साहित्य वाटप कार्यक्रमासाठी शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना बीएसएनएलने ४जी नेटवर्क सेवा सुरू केली आहे. देशभरात एक लाख टॉवर्स उभारण्यात येणार आहेत. त्यापैकी १० ते २० हजार टॉवर्स महाराष्ट्रात उभारण्यात येणार असल्याचे देखील एकनाथ शिंदे यांनी या वेळी सांगितले.

**■ दुश्मानांवर देखरेख**

महाराष्ट्र राज्यासह देशाच्या सीमाभागात तैनात असलेल्या लष्करी जवानांनादेखील त्याचा उपयोग होणार असून, दुश्मानांच्या हालचालींवरदेखील लक्ष ठेवण्यासह त्यांना प्रत्युत्तर देण्यासदेखील या नेटवर्कची मदत होणार आहे.

**■ आत्मनिर्भर भारताचे पाऊल**

स्वदेशी असल्यामुळे आत्मनिर्भर भारताचे पुढचे पाऊल असून, देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. बीएसएनएल तोट्यात जात होती, मात्र या निर्णयामुळे ती फायद्यात येणार आहे.

**■ देशातील पहिले राज्य**

दिव्यांगांना आधार देण्याचे काम आणि कार्य सुरू असल्याचे सांगत महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य असूनस ते दिव्यांग मंत्रालय करणारे, दिव्यांग बां धवांना खऱ्या अर्थाने विशेष मुलांना मानवता आणि माणुसकी म्हणून संस्था काम करीत असल्याचे सांगत त्यांनी शुभेच्छा दिल्या.



# उल्हास, काळू, भातसा नद्यांच्या पाण्याच्या पातळीत वाढ !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली शहरासह कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागातील गावासह उल्हासनदी खोर्यातील आजूबाजूच्या परिसरात गेल्या २४ तासापासून धुवाधार पाऊस पाऊस कोसळत असल्याने काही सखल भागात पाणी साचले. तर उल्हास नदी व काळू नदीची पातळी वाढल्याने नदी दुथडी भरून वाहत असल्याने प्रशासनाने नदी किनारी असलेल्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला होता. उल्हास नदी मोहीली परिसरात पाणी दुथडी भरून वाहत असून मोहेली आणि म्हारळ परिसराला जोडणारा पूल पाण्याखाली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उल्हास नदीच्या पाण्याची पातळी वाढली आहे. नदी किनारी राहणार्या नागरीकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असल्याची माहिती कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांनी देत उल्हासनदी पाणी पातळी वाढ पाहता मोहीली म्हारळ जोडणार्या पूलावरील वाहतूक बंद करणार असल्याचे सांगितले. तर रायते पूल देखील पाण्याखाली गेल्याने संध्याकाळी बंद करण्यात आला. तसेच भातसा नदी खडवली पूल पाण्याखाली गेला. काळूनदीवरील रुंदे पूल पाण्याखाली गेल्याने जन जीवन विस्कळीत झाले. काळू, भातसा, उल्हास नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडल्याने नदी किनारी राहणाऱ्या लोकांना सावधनेतेचा इशारा देत प्रशासन लक्ष ठेवून होते.

## २६४ अनधिकृत बांधकामांवर कारवाई
## १९८ बांधकामे निष्कासित
## ६६ वाढीव बांधकाम हटवले

# ठाणे महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामाच्या ५० प्रकरणात गुन्हे दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (२९) :** मा. उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश आणि प्रभाग समितीच्या बीट निरिक्षकांनी केलेल्या पाहणीत तसेच दिवा आणि मुंब्रा येथील विशेष दक्षता पथकांच्या पाहणीत आढळलेल्या एकूण २६४ अनधिकृत बांधकामांवर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने आतापर्यंत कारवाई केली आहे. त्यापैकी १९८ बांधकामे पूर्णपणे निष्कासित करण्यात आली आहेत. तर, ६६ बांधकामांमधील अनधिकृत वाढीव बांधकाम हटवण्यात आले आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात, जून महिन्यापासून नियमितपणे अतिक्रमण विरोधी पथकाची कारवाई सुरू आहे.




महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी या कारवाईचा शनिवारी (२७ सप्टेंबर) आढावा घेतला. या आढावा बैठकीस, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सहाय्यक नगररचना संचालक संग्राम कानडे, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, शंकर पाटोळे, दिनेश तायडे, उपनगर अभियंता विकास ढोले, सुधीर गायकवाड, विधी अधिकारी मकरंद काळे, सर्व प्रभाग समितीचे सहायक आयुक्त आणि कार्यकारी अभियंता आदी उपस्थित होते.

कोणतेही अनधिकृत बांधकाम सुरू राहू नये यासाठी सर्व यंत्रणेने दक्ष राहावे. तसेच, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आवश्यक त्या प्रकरणात तातडीने एमआरटीपीअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे निर्देश महापालिका आयुक्त राव यांनी दिले आहेत. गुन्हे दाखल करताना प्रत्यक्ष पाहणी आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा वापर करून अचूक माहिती नोंदवावी, असेही आयुक्त राव यांनी सांगितले. ज्या अनधिकृत बांधकामांचे पाडकाम शिल्लक असेल त्याचे प्रवेश मार्ग (जिने) पाडून पत्रे लावून बंद करावेत, असेही त्यांनी म्हटले.

तसेच, अनधिकृत बांधकामात घर घेऊ नये असे आवाहन करणारे फलक मोक्याच्या जागी लावावेत. नागरिकांनाही घर खरेदी करताना बांधकाम अधिकृत असल्याची खात्री महापालिकेच्या शहर विकास विभागाकडून करून घ्यावी, असे आवाहनही आयुक्त राव यांनी केले आहे.

अधिकृतपणे ज्या इमारतींचे बांधकाम सुरू आहे, त्या सर्व ठिकाणी दर्शनी भागात क्यू आर कोड लावण्यात आले आहे. ते क्यू आर कोड मोबाईलवर स्कॅन करून बांधकाम परवानगीची माहिती कोणालाही उपलब्ध होऊ शकते, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

महापालिका क्षेत्रात अनधिकृत चाळी, अनधिकृत बैठी बांधकामे, वाढीव शेड, वाढीव बांधकाम, प्लिंथचे बांधकाम, अनधिकृत टर्फ या प्रकारच्या बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे. या मोहिमेची अमलबजावणी आणि प्रत्यक्ष कारवाई यांचा दैनंदिन स्वरुपातील आढावा अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे घेत आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

ठाणे ■ सोमवार
29 सप्टेंबर 2025
दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**



# डोलवी नजीक अज्ञात वाहनाच्या धडकेत महिलेचा जागीच मृत्यू !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी)** मुंबई -गोवा महामार्गावरील डोलवी गावाजवळील ब्रिजवर १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी सुमारे साडेसात वाजन्याच्या सुमारास अज्ञात वाहनाच्या धडकेने पेण मधील ४७ वर्षीय महिलेचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, नलिनी प्रविण म्हात्रे (वय ४७) रा. सागर सोसायटी, पेण ह्या आपल्या ताब्यातील ज्यूपिटर स्कूटी (एम.एच.०६ बी.टी. १८५२) वरून मौजे डोलवी गावा जवळील ब्रिजवर वडखळकडून कोलाड दिशेने जात असताना कोणत्यातरी अज्ञात वाहनाने त्यांना ठोकर मारली. या अपघातानंतर वाहनधारक येथून निघून गेला आणि नलिनी खाली पडल्याने डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाल्याने संपूर्ण पेण येथील सागर सोसायटीत शोककळा पसरली आहे.

वडखळ पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली असून आरोपी हा अज्ञात असल्याने पोलीस तपासाद्वारे त्याचा शोध घेत आहेत. दरम्यान, झालेल्या घटनेचा तपास वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगिता सांगळे या करीत आहेत.अशा प्रकारच्या अपघातांबाबत खबरदारी घेण्याचे आवाहन पोलीस नागरिकांना करत आहेत.

# नवरात्रीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमाला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** शाहू शिक्षण संस्था संचलित मातोश्री वेलबाई देवजी हरिया कनिष्ठ महाविद्यालय आणि शाहू अध्यापक महाविद्यालय शहाड कल्याण येथे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी म्हणून सालाबादप्रमाणे यावर्षी ही "पर्व जनजागृतीचे व्याख्यानमाला" घटस्थापनेपासून आयोजन करण्यात आले आहे. गेल्या पंधरा वर्षापासून हा उपक्रम महाविद्यालय घेत आहे. घटस्थापनेला उपक्रमाचे उद्घाटन डॉ गिरीश लटके साहित्यिक आणि डॉ सुर्यकांत भोसले प्रशासकीय अधिकारी शाहू शिक्षण संस्था पंढरपूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्याच दिवशी व्याख्याता प्रा. राकेशकुमार यादव यांचे पर्सनल ब्रँडींग स्वत ची ओळख निर्माण करणे या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर "आजची तरुण पिढी आणि मृगजळ" या विषयावर व्याख्यान संदिप पाटील यांनी विविध उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गजानन पाटील यांचे "ग्राहक जागृती भेसळयुक्त अन्न" यावर प्रयोगात्मक माहिती पूर्ण व्याख्यान झाले. डॉ दिनेश गुप्ता यांनी "माईंन्डसेट" यावर आजच्या काळातील विद्यार्थ्यांनी आपले ध्येय सिद्ध करण्यासाठी माईंन्डसेट कसे करावे प्रयोगातून विविध कृतीतून दाखवून दिले. या व्याख्यानमालेला विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. प्रमुख उपस्थिती बीएड प्राचार्या वैशाली पाटील, कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या कल्पना सोमनाचे, बी एड कॉलेज व ज्युनियर कॉलेज शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन बबन पाटील, कल्याणी उगले, नम्रता चिंदरकर, श्रेया वरूडकर यांनी केले.

# पडघा सेवा सहकारी सोसायटीच्या वार्षिक सभेत विविध विषयांवर चर्चा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा दि.२९ (प्रतिनिधी)** भिवंडी तालुक्यातील पडघा विभागातील १५ गावांतील ६८८ शेतकरी सभासद संख्या असलेल्या पडघा गृप विवीध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. पडघा सोसायटीची ही सभा सभापती रमेश रामचंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयासंदर्भात सोसायटीच्या नवीन बांधकाम इमारतीत शुक्रवारी घेण्यात आली यावेळी मागील सभेचे



प्रोसेडींग, ताळेबंद, नफा तोटा पत्रक, अदांजपत्रक वाचून सभेमध्ये मंजुरी घेण्यात आली.यावेळी उपस्थीत सभासदांनी कर्जवाटप, बोनस, संचालक शैक्षणीक दौरा तरतुद, थकबाकीदारांची यादी छापणे, लेखापरीक्षकाचां अहवाल वार्षिक अहवालात प्रसिद्ध करणे, सभासद शेतकऱ्यांना लाभांश देणे आदी विषयासंदर्भात प्रश्न उपस्थित केले. यावेळी सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची अध्यक्ष रमेश पाटील मुख्य सचीव ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी समाधानकारक उत्तरे दिली. यावेळी उपसभापती सुरेश पाटोळे, संचालक दत्तात्रेय पाटोळे, श्रीकांत गायकर, गुरूनाथ मते, रामचंद्र म्हात्रे, देवीदास पाटील, राजाराम जाधव, दिपक जाधव, दीलीप पाटील, भारती घावट, अंजना पाटील, मनोहर पाटील, तज्ञ संचालक ज्ञानेश्वर हुकमाळी उपस्थित होते.तर यावेळी सभासद अजय पाटील, अशोक गायकवाड, अरुण पाटोळे यांनी चर्चेत सहभाग घेतला यावेळी पडघा टीडीसी बँकेचे व्यवस्थापक चंद्रशेखर दोंदे सहसचिव शितल कशीवले व ७५ शेतकरी सभासद उपस्थित होते सभेचे सुत्रसंचालन सचिव ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी केले.



# नवरात्रौउत्सवा निमित्त रायते येथे मोफत आरोग्य शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण -** मुरबाड राष्ट्रीय महामार्गालगत रायते येथे रेड स्वस्तिक व स्पर्श फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने व जय मातादी मित्र मंडळ रायते यांच्या वतीने महा आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते यामध्ये १९५ नागरिकांनी आपली आरोग्यची तपासणी करून घेतली यात ई.सी.जी,शुगर,ब्लड प्रेशर,जनरल तपासणी, दंत तपासणी,कार्डीयक चेकअप,स्त्रीरोग तपासणी ऑर्थोहाडांची तपासणी,बोन डेंसिटी टेस्ट अशा विविध प्रकारच्या सुविधा ऐ.एस.जी (ASG) हॉस्पिटल कल्याण,साई सिटी हॉस्पिटल अंबरनाथ, सिद्धेश्वर हॉस्पिटल टिटवाळा यांच्या मार्फत मोफत पुरविण्यात आल्या

यामध्ये महिला, पुरुष, लहानमुले यांचा मोठया प्रमाणात सहभाग होता, सध्या सर्वत्र आरोग्याची समस्या खुप मोठया प्रमाणत निर्माण झाली असुन मंडळानी अशाच प्रकारांचे उपक्रम राबुन नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी व त्यांना सहकार्य करावे असे आव्हान राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ठाणे ग्रामीणचे जिल्हाउपाध्यक्ष राम सुरोशी यांनी केले आहे

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष राम सुरोशी,जेष्ठ पत्रकार जैतु मुठोलकर, पत्रकार नारायण सुरोशी,शिवसेना युवा नेते माजी सरपंच संतोष सुरोशी, माजी सरपंच सुनील सुरोशी,जेष्ठ नागरिक सोंग्या पवार,कॉंग्रेस तालुका युवक अध्यक्ष अमोल सुरोशी,सुदाम भोईर, अशोक जाधव शरद पवार, श्रीकांत तारमले, विशाल घावट, नागरिक,ग्रामस्थ व मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी रेड स्वस्तिक सोसायटी,भारत चे सव्यवस्थापकीय संचालक डॉ प्रमोद नांदगावकर ,कमलेश बोनवटे ,मुकुंद नावकर, लखन जगताप स्पर्श फॉउंडेशन चे अध्यक्ष डॉ पुष्पराज स्वामी कांचन गौंड,डॉ सिद्धेश्वर चामनारू उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजक व जय मातादि मित्र मंडळाचे अध्यक्ष किरण पवार,वासुदेव पवार शनी पवार यांनी सर्वांचे आभार मानले

# शेतकऱ्यांच्या अडचणी टाळण्यासाठी धान खरेदी केंद्रे लवकर सुरु करा

## आ.सुधीर मुनगंटीवार यांची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**चंद्रपूर :** धान उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आधारभूत किंमत योजनेअंतर्गत धान खरेदी व नोंदणी केंद्रे नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यातच सुरु करावीत, अशी मागणी राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगनजी भुजबळ यांच्याकडे केली आहे. या संदर्भात आ.मुनगंटीवार यांनी पत्र लिहून प्रश्न लवकर निकाली काढण्याची विनंती केली असून, लवकरच ते प्रत्यक्ष भेट घेऊनही पाठपुरावा करणार आहेत.

आ. मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केले आहे की, चंद्रपूर जिल्ह्यात हलके धान 90 दिवसांत तर मध्यम धान 120 दिवसांत तयार होते. सिंचनसुविधा नसलेल्या शेतकऱ्यांकडून प्रामुख्याने या प्रकारचे उत्पादन घेतले जाते. मात्र, गेल्या वर्षी (सन 2024-25) धान खरेदी केंद्रे डिसेंबर महिन्यात सुरु झाली. त्यामुळे शेतकऱ्यांना धान साठवून ठेवण्यास अडचण निर्माण झाली. परिणामी अनेकांना खाजगी व्यापाऱ्यांना कमी दराने धान विकावे लागले, ज्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

आ. मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे की, 2025-26 या वर्षात अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये. त्यासाठी नोव्हेंबर 2025 च्या पहिल्या आठवड्यातच खरेदी केंद्रे सुरु करावीत. खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांना नोंदणीसाठी आणि विक्रीसाठी सुलभ व पारदर्शक व्यवस्था ठेवावी.

तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा मोबदला आधारभूत किंमत (MSP) नुसार त्वरीत अदा करण्यासाठी संबंधित विभागाला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि मंत्री छगनजी भुजबळ यांना केली आहे.

धान खरेदी केंद्रांची संख्या वाढवून अधिकाधिक शेतकऱ्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे ही शासनाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच या मागणीबाबत पाठपुरावा करण्यासाठी ते मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगनजी भुजबळ यांची प्रत्यक्ष भेट लवकरच घेणार आहे.



# मुरबाड : परतीच्या पावसाने जनजिवन विस्कळीत!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड/दिलीप पवार :** राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटात सापडला असताना परतीच्या पावसामुळे मुरबाड तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे जनजीवन विस्कळीत झाले आहेत, तर अनेक रस्ते पाण्याखाली गेले असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले भाताचे उभे पिके आडवी झाल्याने शेतकरी संकटात सापडला आहे.

मुरबाड शहरात सरासरी 278 मि.मी, धसई परिसरात 54 मि.मी. न्याहाडी परिसरात 68 मि.मी. सरळगावं परिसरात 120 मि.मी. तर देहरी परिसरात 73 मि.मी.पावसाची नोंद झाली असून मुरबाड तालुक्यात 118.60मि.मी. पावसाची नोंद झाली असल्याचि माहिती प्रशासनाकडून मिळत आहे . यामुळे तालुक्यातील अनेक रस्ते पाण्याखाली गेले आहेत. यात प्रामुख्याने पुलावरून पाणी गेल्याने चिखले कडून शहापूर कडे जाणारा रस्ता बंद आहे, कल्याण मुरबाड रस्त्या पासून घोरले कडे जाणारा रस्ता बंद आहे, किशोर कडून नांदेणी कडे जाणारा रस्ता बंद आहे खाटेघर कडून डेहनोलि येथे जाणारा रस्ता बंद आहे. तर धसई कडुन कांदळी गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर नाल्याचे पाणी आल्याने या गावांचा संपर्क तुटला आहे . तालुक्यात झालेल्या या अतिवृष्टीचा फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतीतील भाताची उभे पिके आडवी झाली असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास जाण्याची वेळ आल्याने शेतकरी चिंतातुर झाले आहेत.

त्यातच शहाड येथील कल्याण मुरबाड रस्त्यावरील उड्डाण पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू होत असल्याने कल्याण मुरबाड रस्ता वाहतुकी साठी 15 ऑक्टोबर पर्यंत बंद केला असून सर्व वाहतूक बदलापूर मार्गें वळवण्यात आल्याने प्रवाश्यांना मोठा आर्थिक व शारीरिक फटका बसणार आहे. त्यामुळे मुरबाड टिटवाळा बस सेवा सुरू करण्याची मागणी प्रवाशी वर्गातून होत आहे. हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजा नुसार पडलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसत आहे.

# जेएसडब्ल्यूच्य प्रदूषणामुळे नागरिक त्रस्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अलिबाग, ता. २८ (वार्ताहर)** जेएसडब्ल्यू स्टील प्लांटमधील अनियंत्रित प्रदूषणामुळे तालुक्यातील नागरिक त्रस्त झाले आहेत. लाल धुळीचे कण, केमिकलयुक्त पाण्याचा सांडपाणी म्हणून खाडीत विसर्ग, शेतीवर वेस्ट स्लॅग टाकणे, कांदळवनांची कत्तल अशा प्रकारांमुळे पर्यावरणीय हानी सुरू आहे. या प्रदूषणामुळे स्थानिकांमध्ये श्वसनाचे आजार, त्वचेचे त्रास आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांमध्ये वाढ झाली आहे. यामुळे प्रदूषणविरोधी कृती समितीने १३ ऑक्टोबर रोजी प्रांत कार्यालयावर मोर्चा काढण्याचे आयोजन केले आहे. या मागण्यांसाठी उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांना निवेदनही देण्यात आले आहे. २२ ऑगस्ट रोजी झालेल्या जनसुनावणीमध्ये स्थानिकांची प्रदूषणविरोधी भूमिका घेऊन आणि प्रशासनाच्या परवानगीची पायमल्ली करीत कंपनीने विस्ताराचे काम सुरू केले आहे. हे काम तत्काळ थांबवण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

**कंपनीने भरपाई द्यावी**

प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना होईपर्यंत जेएसडब्ल्यू कंपनीचे उत्पादन तत्काळ थांबवण्यात यावे. पर्यावरण मंजुरी रद्द आणि स्थगित करावी, अशा मागण्या कृती समितीच्या वतीने करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे आरोग्यावर व शेतकरी, मच्छीमारांच्या उपजीविकेवर झालेल्या नुकसानीसाठी कंपनीकडून तातडीने आर्थिक भरपाई देण्यात यावी. त्यासोबत आरोग्य विमा व वैद्यकीय सुविधा मोफत देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.



# पडघा परिसरातील भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा दि.२८ (प्रतिनिधी)** भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरातील शेकडो खेडी, पाडी, गावात असणाऱ्या भातशेतीचे वारा व पावसाच्या संततधारेमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

पडघा परिसरात शनिवारपासुन पासुन पावसाची संततधार, वारा सुरू असुन रविवारी सकाळपासून पावसाचा जोर वाढल्याने परिसरातील नदी, नाले, ओहळ दुथडी भरून वाहू लागले त्याचे व सतत पडणाऱ्या वाऱ्यासह पावसाचे पाणी परीसरातील भातशेतीत शिरल्याने भाताची लोबें तयार व्हायला लागलेली उभी भाताची रोपे आडवी झाली आहेत तसेच आडवी झालेली भातरोपे पाण्याखाली गेल्याने भातउत्पादक शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमीनीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यंदा पाऊस चांगला पडल्याने भातशेती बहरली होती व भाताची लोबें तयार व्हायला लागली होती. त्यामुळे शेतकरी आनंदात होते पंरतु शनिवार पासुन पडणाऱ्या संततधारेमुळे भातशेतीचे नुकसान होऊन शेतकऱ्यांचा तोंडचा घास नैसर्गिक आपत्तीने हीसकावला असल्याची भावना शेतकऱ्यांच्यात व्यक्त होत आहे त्यामुळे शासनाने तातडीने पंचनामे करून भातउत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी व कुणबी सेनेचे भिवंडी तालुका संघटक रमेश गोंविद शेलार यांनी केली आहे.



# भगव्या झेंड्याला बळकटी देण्यासाठी एकजुटीने काम करा – खा. नरेश म्हस्के

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** प्रतिनिधी दिलीप बारटक्के यांनी उपशाखाप्रमुख ते शिवसेना गटनेता पदापर्यंतचा प्रवास अत्यंत मेहनतीने, सातत्यपूर्ण लोकसेवेच्या माध्यमातून आणि प्रामाणिकपणे केला. जनतेच्या समस्या समजून घेऊन त्यावर तत्परतेने उपाय करणं, आणि गरजूंना न्याय मिळवून देणं याला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिलं. त्यांच्या या कार्यामुळे शिवसेनेचा भगवा झेंडा त्या विभागात अभिमानाने फडकत आहे. त्यामुळे या भगव्या झेंड्याला अजून बळकटी देण्यासाठी, एकजुटीने काम करा आणि लोकसेवेची परंपरा जपा असे खासदार नरेश म्हस्के यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर नगर, ठाणे येथे नगरसेवक दिलीप बारटक्के यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनाचा सोहळ्यात बोलताना शिवसेनेच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांना आवाहन केले. तसेच दिलीप बारटक्के यांना त्यांच्या नवीन जनसंपर्क कार्यालयासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवसेना सचिव राम रेपाळे, विभागप्रमुख आणि माजी नगरसेवक एकनाथ भोईर, नगरसेविका आशा डोंगरे, दिनेश मलपे तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिवंडी तालुक्यात पावसाचा हाहाकार !

## नद्यांवरील पुल पाण्याखाली गेल्याने नागरीकांचे हाल



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**■ राजेश दळवी**

**पडघा दि. २८** भिवंडी व कल्याण तालुक्याच्या हद्दीतून वाहणाऱ्या खडवली येथील नदीने पावसाच्या संततधारेमुळे धोक्याची पातळी ओलांडली असुन मध्य रेल्वेच्या खडवली स्टेशनकडे व विविध शहर गांवाकडे जाण्यासाठी असणारा जाणारा पुल पाण्याखाली वाहनचालकांसह नागरीकांचे हाल झाले. शनिवारपासुन खडवली परिसरात पावसाची संततधार सुरू असुन रविवारी पावसाचा जोर वाढल्याने खडवली येथील भातसा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असुन ती दुथडी भरून वाहू लागल्याने पडघा व मुबंई नाशीक महामार्गावरून मध्य रेल्वेच्या खडवली स्टेशनकडे, टिटवाळा, मुरबाड, बदलापूरकडे जाण्यासाठी असणारा खडवली नदीवरील पुल पाण्याखाली गेल्याने वाहतूक बंद करण्यात आली. तसेच खडवली रेल्वे स्थानकावरुन मुंबई व उपनगरात, खडवली परिसरातील गावामध्ये जाणाऱ्या वाहनचालक, नागरीकांचे, विद्यार्थ्यांचे, चाकरमान्यांचे हाल झाले.तसेच खडवली पुलाजवळील शिव मंदीर व परीसरातील उद्योगधंदे पाण्याखाली गेले. नदीचे पाणी नदीजवळ असलेल्या मातोश्री वृध्दाश्रमाच्या संरक्षण भिंत व प्रवेशद्वारापर्यंतआले होते.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024